
ISSUE #3

# SPANDAN

ROTARY CLUB OF PUNE KARVENAGAR

10 DECEMBER 2024



It is better to light lamp in darkness than to curse it
- Maharshi Karve

PRESIDENT: RTN DEEPAK THITE

## Here's what happened last month!

**DG visit**:

DG Shital Shah visited our club on 8th November 2024.
Meeting with BOD was conducted between 5:30 PM to 6:30 PM. In this meeting all BOD members talked about projects in their respective avenue. Rtn AG Atul Atre expressed his opinion about the club he gathered during AG visit.
Later the meeting with all club members was held from 7:00 PM to 8:15 PM. In the same, President Deepak Thite presented all the projects/activities undertaken by club till November 2024.

Al lthe planned and upcoming projects/events were also presented during the same. Span of thrust areas covered by club projects are making the club to entitle under "Playing 11" category of awards outlines by DG Shital Shah.
DG Shital Shah was overall happy with the club activities and projects. He appealled all members to donate generously towards APF







**Speech on Foundation**:

A lecture by PDG Dr. Deepak Purohit was organised in synergy with RCP Gandhi Bhavan and RCP Wisdom.
During his talk, PDG Dr. Deepak Purohit gave a broad spectrum of various areas and activities those are covered by funds available under foundation.








**Orchestra for collecting donation for Polio**:

An orchestra of Hindi film songs was arranged by RCP Camp on 25th November 2024. Clubs who have donated minimum $100 towards polio foundation were cohost for this program. Along with RCP Karvenagar, there were about 38 clubs who were cohost for this program.

Till the date of the program, about 13 lakh Rs. were collected towards polio foundation. DG Shital Shah, PDG Girish Gune were also present for the program.





**Kashmir before and after 370**

A lecture by Dr. Pratibha Athavale was organized in synergy with Pune Pride, Sinhagad Road, Synergy, Sahawas, University, Lokmanyanagar, Pashan and Wisdom.

During her talk Dr. Athavale shared her experiences when she worked in various districts of Kashmir for dental treatment of residents there. She is visiting Kashmir from about 10 years to treat residents free of cost. She mentioned that the Indian Army is of great help when rendering medical services to people in Kashmir.












# Sketches by Rtn. Ashok Bapat









Story by Rtn. Deepak Naniwadekar

अनपेक्षित भोजन:

मी आत्ता जी गोष्ट लिहीत आहे ती साधारणपणे १९८८ - ८९ मधील आहे. त्यावेळी मी भारतभर वेगवेगळ्या सिमेंट प्लांट्सच्या उभारणीच्या कामासाठी फिरत असे, तसेच माझ्या कंपनीचे प्रॉडक्ट्स विकण्यासाठीही फिरत असे. राजस्थान आणि मध्यप्रदेशच्या बॉर्डरवर बरेच सिमेंट प्लांट्स आहेत. तेथे नयागाव म्हणून एक अगदीच छोटे गाव होते, आता ते बरेच मोठे झाले आहे. तिथे विक्रम सिमेंट म्हणून एक मोठा सिमेंट प्लांट आहे व माझे ह्या प्लांटमध्ये बरेच येणे जाणे होते. सर्वसाधारणपणे त्याकाळी सिमेंटचे कारखाने त्यांच्या धुरांड्यामधून धुळीचे मोठे मोठे लोट सोडत असत आणि त्यामुळे प्लांटच्या आजूबाजूला चांगली शेती होऊ शकायची नाही व तसेच रहात्या वस्तीलाही धुळीचा खूप त्रास व्हायचा. तसेच ह्या प्लांट्सला खूप मोठी जागा लागायची कि जी शहराजवळ खूप महागात पडायची. म्हणून हे सर्व प्लांट्स शहरांपासून दूर खेड्यापाड्यात असायचे. त्यातच सिमेंटला लागणारा सगळ्यात मोठा कच्चा माल म्हणजेच चुनखडी, ही राजस्थान मध्यप्रदेशच्या बॉर्डरवर मोठ्या प्रमाणावर मिळत असल्याने बरेचसे प्लांट्स ह्या भागातच होते.

त्यावेळी भारतात बिमारू स्टेट्स म्हणून ओळखली जाणारी मागासलेली राज्ये म्हणजेच बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान व उत्तरप्रदेश हि चार विशेष मागास राज्ये होती. अशा परिस्थितीत आमचे नयागाव हे राजस्थान व मध्यप्रदेशच्या बॉर्डर वरचे गाव असल्याने ते अति मागास होते. तिथे जायचे म्हणजे पुणे ते रतलाम हे ब्रॉडगेज रेल्वेने जायचे, तेथून मीटरगेज रेल्वेने निमचला जायचे व तेथून बसने किंवा जीपने किंवा सिमेंटच्या ट्रकने नयागावला जायचे असा २४ ते २६ तासांचा प्रवास होता. तेंव्हापासूनच इंदोर ते नयागाव हा स्टेट हायवे होता कि जो पुढे चित्तोडगड - उदयपूर पर्यंत जायचा. सध्याप्रमाणे हा हायवे काही चौपदरी व मोठे पूल असलेला नव्हता. हा हायवे कमी आणि गाव रस्ता जास्ती होता. हा रस्ता दुपदरी होता आणि जेंव्हा जेंव्हा नदी किंवा ओढा यायचा त्याआधी एक पाटी हमखास असायची कि, `पुलिया क्षतिग्रस्त है, वाहन धीरे चलावे'. ज्या नद्या व ओढे बारमाही वाहात नसायचे, त्या नदीपात्रात मोठे सिमेंट पाईप टाकून पाणी वाहायची व्यवस्था केली जात असे व त्या पाईप वर जाड फरशी किंवा स्लॅब घालून त्यावरून गाड्या नेल्या जायच्या. हा जो रस्ता केला जायचा तो मुख्य रस्ता नदीत उतरवून पाइपवरून जायचा व नदी संपली कि वर चढायचा. अशामुळे जेंव्हा जोरात पाऊस यायचा त्यावेळी हा नदीतील रस्ता पाण्यात जायचा व सर्व वाहने मुख्य रस्त्यावर पाणी उतरण्याची वाट पाहत थांबून राहायची. ह्या भागात मोठ्या पावसाचे प्रमाण कमी असल्याने साधारणपणे तास दोन तासात पाणी कमी व्हायचे व वाहतूक परत चालू व्हायची. पाऊस जोरात असेल तर प्रवास करणारी माणसे बाहेर पडायची नाहीत व ट्रकवाले जवळच्या धाब्यावर थांबायचे.

माझा परतीचा नयागाव ते पुणे हा प्रवास रतलाम पर्यंत बसने व्हायचा कारण परतीच्या प्रवासात रेल्वे रात्री खूप उशिरा असायची कि ज्यामुळे पुण्याला पोहोचायला ३० ते ३२ तास लागायचे. अशाच एका दिवशी अचानक आकाश ढगांनी भरून यायला लागले होते. हा काही पावसाचा सिझन नव्हता. माझे प्लांट मधील काम काही ना काही कारणांनी लांबले होते आणि घरापासून खूप दिवस दूर राहिल्याने, काहीही करून घरी जायची तीव्र इच्छा होत होती. खुप दिवस मित्रांना भेटलो नव्हतो, बादशाहीमध्ये मिसळ खाल्लेली नव्हती आणि फर्ग्युसन कॉलेज रोडवर हिरवळ बघायला मान १८० डिग्रीमध्ये फिरवत हिंडलेलो नव्हतो. त्यावेळी STD सेंटर वर अर्धा पाऊण तास थांबल्यानंतर कधीतरी फोन लागायचा आणि कधी कधी तर १० ते १५ दिवस घरी संपर्कही नसायचा. आता काम खूप झाले, चला घरी असा संदेश आतून वारंवार यायला लागला होता.

आणि अचानकपणे सर्व योग जुळून येत, लंचनंतर  माझे काम यशस्वीपणे संपले, मिनिट्स ऑफ मिटिंग झाली म्हणजेच काम संपल्याची पावती मिळाली आणि मी सगळ्यांचे घाईघाईत निरोप घेतले व कामाचे सामान असलेली बॅग घेऊन गेस्टहाऊस मध्ये आलो. प्रत्येकवेळी नशिबाने कधी चांगल्या तर कधी वाईट अशा गोष्टी घडत असतात. यावेळी नशीब चांगले होते, प्लॅन्टमधील एक जीप जवळच्या तालुक्याला म्हणजेच निमचला जाणार होती. त्यामधून माझ्याच डिपार्टमेंटची माणसे जाणार होती, ती म्हणाली चल आमच्या बरोबर. एवढी चांगली सोय, म्हणालो देवाचीच कृपा. गेस्टहाऊस मधील सेवकाला बक्षिसी दिली व लॉंड्रीतून कपडे आणायला पिटाळले आणि बॅग भरायला घेतली. तो कपडे घेऊन आला व बॅग भरत असताना म्हणाला, साहेब बाहेर पावसाची चिन्हे दिसत आहेत, आज कशाला जाता, उगाच रस्त्यात अडकून पडाल आणि खायलाही मिळणार नाही.  आज जेवून आराम करा व उद्या जा. पण असले सल्ले ऐकायच्या वयात मी नव्हतो आणि काहीही करून पुण्याला पोहोचायचेच होते.  त्याला म्हणालो आता मी काही थांबणे शक्य नाही. काही खाण्याचे सामान बांधून देणार असशील तर बघ. तो बघतो म्हणाला पण  तेवढ्यातच जीप मधून मित्रांनी हॉर्न मारला व मी बॅग घेऊन बाहेर पडलो. दुपारचे जेवण  पोटात होते . म्हणालो वाटेत खाऊ. जीपने मला तासाभरात निमचच्या बस स्टॅण्डवर सोडले  तेंव्हा संध्याकाळचे सहा  वाजत आलेले होते. आकाशात ढग असल्याने अंधार जाणवू लागला होता व भुकेचीही जाणीव होत होती.  स्टॅण्डवर काही खावे म्हणून बघत होतो तर रतलामला जाणारी बस माझ्यासमोरच येऊन उभी राहिली. आता खाणे बाजूला ठेवून बस मध्ये बसलो. ह्या खाजगी बसेस असल्याने त्या कधी सुटतील व कधी थांबतील हे सांगणे कठीण होते. बस निघाली, बस थांबली, परत निघाली, परत थांबली असे अनेकवेळा झाले व शेवटी ती मुख्य रस्त्याला लागली. जसा बसने  वेग घेतला तसा पावसाने देखील वेग घेतला. खिडकीतून आत येणारा पाऊस माझा खांदा ओला करत होता. गाडीत बिडी पिणारी माणसे बिड्या ओढायला लागली होती. बसची घरघर, कष्टकरी माणसांचा घामाचा वास, बायकांची कलकल, रडणारी मुले, इतरांच्या आपापसात चाललेल्या गप्पा, बिडीचा धूर, दिवसभर काम करून झाल्यावर दमून  येणारी पेंग आणि रिकाम्या पोटातील कल्लोळ याचे एक विचित्र कॉम्बिनेशन झाले होते. झोपही येत होती आणि भूकही लागली होती पण आता बसही थांबत नव्हती.   असाच काही वेळ प्रवास झाला, घड्याळाला डोळे लावून बघितले तर ८ वाजून गेले होते. मनात म्हणालो, चला रात्री १० पर्यंत रतलामला पोहोचू, जेवू आणि नंतर रात्री १२ ला येणारी एक्सप्रेस पकडून मुंबई गाठू. असाच काही वेळ डोळे मिटून बसून राहिलो. थोड्या वेळाने गाडीचा वेग कमी झाला व ती हळूहळू थांबली. बाहेरचा अंदाज घेतला तर रिमझिम पाऊस चालू होता व इतरही गाड्या थांबलेल्या आहेत असे वाटत होते. आमच्या गाडीतील काही प्रवासी बाहेर पडताना पाहिले आणि म्हणालो चला आपणही बाहेर जाऊन पोटातील पाणी कमी करून येऊ. बाहेर येऊन बघितले तर बरीच माणसे उभी होती. त्यांना का थांबला आहात असे विचारले तर ते म्हणाले कि नदीला पाणी आलेले आहे आणि आता पाणी कमी झाल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. मनात म्हणालो कि आता अडकलो. चौकशी केली कि गावापासून किती दूर आहोत, तर समजले कि कमीतकमी ५ कि.मी. व ढाबा साधारपणे ४ किमी वर आहे व तो सुद्धा रात्री बंद असतो. विषय संपला. आता बोंबला, रात्रभर उपाशी रहायचे किंवा कोणी काही खायला देतंय का ते बघायचे. तसे बघायला गेलोतर लांबच्या प्रवासात सहप्रवाशांचे डबे खायला शिकलो होतो.

इतर वाहनांच्या प्रकाशात चालत नदीपर्यंत गेलो. पाण्याचा जोरदार आवाज येत होता. अनुभवी माणसे आता रात्रभर येथेच राहावे लागणार असे आपापसात बोलत होती. मी रिकामाच असल्याने व भारतभर प्रवास केल्याने कोणाशीही कोणत्याही विषयावर बोलायची सवय होतीच म्हणून मीही गप्पात भाग घेतला. मागच्या बसचा व ट्रकचा उजेड चेहऱ्यावर पडत होता, त्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजतही होते. बोलताना मी म्हणालो कि इथल्याच एका प्लान्टवर काम करायला आलो होतो, इलेक्ट्रॉनिक्स  इंजिनिअर आहे, आमचा खानसामा जेवून जा सांगत होता पण काय बुद्धी झाली आणि प्रवासाला निघालो आणि आता अन्न  कधी मिळणार  हे समजत नाही. बोलताना लक्षात आले कि एक माणूस माझ्याकडे नीट लक्ष देऊन माझे बोलणे ऐकत आहे. पण मनात म्हणालो असेल बघत, आपल्याला काय करायचे आहे? माझे सगळे लक्ष कोणी खाण्याचे काही काढतो आहे का याकडेच जास्ती होते. पोटात कळवळून भूक लागली होती. लोकांनी माझी बडबड ऐकून घेतली पण खाण्याचे काही काढले नाही. एकाने तंबाखूची चिमूट देऊ केली, तर दुसऱ्याने बिडी समोर केली, पण मी ह्या दोन्ही गोष्टीत इच्छुक नसल्याने त्यांना नाही म्हणून सांगितले आणि थोड्या वेळाने मी माझ्या बसकडे परत वळलो, म्हणालो झोप आली तर झोपून टाकू.

मी निघालो तेव्हढ्यात मागून एकाने 'अरे साहेबजी' अशी  हाक मारली, म्हणून मागे वळून बघितले तर माझे निरीक्षण करणारच माणूस होता. तेथील लोकल लोकांचेच कपडे घातलेला , डोक्यावर लाल रंगावर पांढऱ्या ठिपक्यांचा मोठा फेटा, पांढऱ्या फुल शर्टावर जाकीट, चिखल उडालेले पण तरीही स्वच्छ पांढरे धोतर आणि उन्हात रापलेला चेहरा असा तो पन्नाशीचा माणूस होता.  हातात काही अधिकार असलेल्या माणसासारखे त्याचे डोळे व चेहऱ्यावर भाव होता पण हाक मारतानाचा आवाज मात्र अतिशय नम्र किंवा मऊ होता. मी थांबलो व का हाक मारतो आहे याचा अंदाज घेतला. तो जवळ आला आणि माझ्या डोळ्यात निरखून पहात म्हणाला,

`क्या तुम पंडत हो?'

माझ्या काही पटकन  लक्षात आले नाही.  माझे आडनाव तर काही पंडित नव्हते. त्याने माझा गोंधळ झालेला पाहून परत  एकदा हळूहळू मला समजेल असे विचारले की,

`क्या तुम पंडत हो?'

आता माझ्या लक्षात आले कि तो मला तू ब्राह्मण आहेस का असे विचारात होता. आता हो म्हणायचे कि नाही ह्या दुविधेत होतो पण पटकन म्हणून गेलो की,

`हा, मैं पंडत हुं'.

खरेतर अंधारातही आपला चेहरा लपत नाही आणि स्वच्छ बोलणे तर त्याहूनही नाही. माझे उत्तर ऐकून त्याने परत विचारले कि

`जनेव है?'

मी शर्टाच्या आत हात घालून चिमटीत जानवे पकडून बाहेर काढून त्याला दाखवले. त्याबरोबर त्याच्या चेहऱ्यावर देवदर्शन झाल्याचे भाव आले. त्याने  मला अर्धे वाकून नमस्कार केला व प्रेमाने  माझा हात पकडला व म्हणाला कि

`अहो भाग है हमारे कि भगवाननेही आपको यहा भेजा'.

मनात म्हणालो कि आता हि काय भानगड आहे? आपण आता धक्क्याला लागणार कि आणखी काही होणार? पण तो ज्या भक्तिभावाने बोलला त्यावर विश्वस ठेवू असे ठरवले. मग त्याने मी कोणत्या गाडीत बसलो आहे हे विचारले, मी गाडी दाखवली. त्याने एका पोराला कडक आवाजात हाक मारली, ते पोरगे अंधारातून समोर आले. मग त्याने मी सामान कुठे ठेवले आहे ते विचारले, मी बोटाने सीट व रॅक मधील बॅग दाखवली. पोटात बाकबूक सुरु झाली होती कि आता पुढे  काय?

त्याने त्या काटकुळ्या पोराला सांगितले कि जा आणि माझ्या जागेवर बस आणि सामानावर लक्ष ठेव. एक जरी गोष्ट येथून हलली तर मी तुला नीट बघून घेईन. पोराला असा ढोस  देऊन झाल्यावर म्हणाला कि, चला महाराज, सामानाची चिंता नको. मी त्याच्या मागोमाग देवावर भरोसा ठेवून निघालो. अजून दोन गाड्या मागे गेल्यावर त्याची बस होती. मस्त सजवलेली मोठी आरामबस होती.  त्याने माझा हात पहिल्यापासून प्रेमाने, अगदी हलकेच धरून ठेवला होता पण एकदाही सोडला नव्हता.  तो आधी व मी त्याच्या मागून बस मध्ये चढलो.

बसमध्ये मोठे वऱ्हाड होते. बायका, पोरे, म्हातारी कोतारी असे बरेच जण होते. त्याचा कलकलाट चालला होता, पोरे आरडाओरडा करत होती. ह्याने सगळ्याना ओरडून गप्प केले. ह्याचा आवाज आल्यावरच बरीच गडबड बंद झाली. म्हणजेच हा सगळ्यात कर्ता पुरुष होता हे माझ्या लक्षात आले. माझ्याशी बोलतानाचा नम्र आवाज जाऊन आता त्याच्या आवाजात आलेली जरब, हि माझ्या सामानाच्या जवळ बसलेल्या पोराशी बोलतानाच लक्षात आली होती आणि आता त्याची जाणीव प्रकर्षाने झाली. पण त्याच बरोबर बस मधील घरगुती बारदाणा पाहून माझ्या देखील जीवात जीव आला. बस मधील आवाज शांत झाल्यानंतर त्याने सर्वांना सांगितले कि देवाची कृपा म्हणून आज आपल्याला हे पंडित मिळाले आहेत आणि त्यांना जेवायला घालायचे आहे. मग मला त्याने परत नम्रपणे सांगितले कि उद्या त्याच्या मुलाचे लग्न नदी पलीकडच्या गावात आहे व हे आज बारात घेऊन निघाले होते. जर का ते पावसात अडकले नसते तर त्यांचे लग्नाआधीचे काही विधी आत्तापर्यंत होऊन गेले असते ब्राह्मणभोजन झाल्याशिवाय त्यांना काही खाता येत नव्हते व माझ्याप्रमाणेच बस मधील सगळेच भुकेलेले . मी जसा कोणी मला खाऊ घालणारा मिळत आहे का ते पाहत होतो, तसेच ते कोणीतरी त्यांना खायची परवानगी देणारा शोधात होते. खरोखरच ईश्वरी योग् अजब असतात, एकाला भूक लागली आहे आणि त्याच्याकडे खाण्याचे काही नाही, तर दुसरीकडे भरपूर खाण्याचे पदार्थ आहेत पण खाणे नियमात बसत नाही.

अशी काही सोय होऊ शकेल याचा कोणी विचारच केला नव्हता आणि समोर मी आलेला पाहून त्यांना एकदम उत्साहाचे भरते आले. मग त्यांनी दोन बाजूच्या सीटवर बसेल अशी फळी टाकली आणि त्यावर एक मोठा पितळी थाळा ठेवला. बाजूला पाच सहा वाट्या लावल्या. बायकांनी भराभर वेगवेगळे डबे उघडले, पोरे त्यात वाकून पाहू लागली व हात घालू लागली. तितक्याच तत्परतेने पोरांच्या हातावर फटके मारून त्यांना दूर सारले गेले आणि आतील पदार्थ थाळ्यात येऊ लागले. बसभर मसालेदार अन्नाचा सुगंध पसरायला लागला. हे चालू असतानाच त्या सदगृहस्थानी स्वतःची ओळख करून दिली व ते मागच्या एका गावाचे मुखिया आहेत असेही सांगितले. ह्याच्या मागच्या दोन गाड्यात त्यांचीच माणसे आहेत हे हि मला समजले. मग त्यांनी मला बूट उतरवायला सांगितले. आता माझ्या मनात कोणतीच भीती नव्हती. एक मोठे प्लास्टिकचे घमेले त्यांनी मागील गाडीतून मागवले व माझ्यासमोर ठेवले. मी पुरेसा चक्रावून गेलो होतो. त्यांनी मला घमेल्यात पाय ठेवायला सांगितले व पायावर पाणी सोडले. वर म्हणाले कि आम्हाला माफ करा कारण गरम पाणी पाय धुवायला आता देता येत नाही. मी मनातच डोक्यावर हात मारून घेतला. आता हात व पाय घमेल्यात धुवून झाल्यावर, त्यांनी सोबतच्या पंचाने ते स्वच्छ कोरडे करून दिले व पायावर व कपाळावर गंधाची बोटे लावली. त्यानंतर माझ्या डोक्यावर एक नवी कोरी पांढरी टोपी ठेवली आणि १०० रुपयांची एक नोट व त्यावर १ रुपयाचे नाणे असे माझ्या हातात ठेवले व त्यानंतर दोन तीन जणांनी मला वाकून नमस्कार केला. मी हि जमतील तसे त्यांना आशीर्वाद दिले. त्यावेळी इंजिनियरचा सुरुवातीचा पगार साधारणपणे १००० ते १२०० रुपये असायचा. १०१ रुपये दक्षिणा म्हणजे किती हे समजण्यासाठी सांगत आहे. हे सर्व झाल्यावर त्यांनी जेवणाच्या मोठ्या थाळ्यासमोर एक बांबूचा मोढा बसायला ठेवला आणि मला जेवायला बसवले. मुखियाने सांगितले कि हे सर्व जेवण घरी बनवले आहे आणि यातील एकही पदार्थ दुकानातून आणलेला नाही, तेव्हा मनात कोणताही किंतु न आणता जेवावे. मी अन्नाला नमस्कार केला, चित्राहुती घातल्या. एकदोन मला आठवणारे मंत्र मोठ्या आवाजात म्हणले. हे चालू असताना सगळ्या बायाबापड्या माझ्याकडे हात जोडून बघत होत्या, त्यांना मंत्रपठण करून झाल्यावर आशीर्वाद देण्यासाठी जसे हात करतात तसे दोन्ही हात उंचावून आशीर्वाद दिला आणि मोर्चा थाळ्याकडे वळवला. पोटात वडवानल पेटलेलाच होता व तरुणपणातील भूक होती, एक एक पदार्थांची आहुती पोटात पडत होती. एक दोन प्रकारचे तिखट जहाल रस्से, दही, चटण्या, गुलाबजाम, गोडाचा शिरा, मऊसूद भाकरी आणि गोडेतेलात तळलेल्या लसणी आणि नंतर भात असे भरगच्च जेवण झाले. मी तुफान आडवा हात मारला पण वाढणाऱ्या बायका मात्र 'आप तो कुछ खा हि नही रहे हो', असे पालुपद लावून बसल्या होत्या. शेवटी तृप्त मानाने उठलो, परत हात धुण्याचा व पंचाने पुसण्याचा कार्यक्रम झाला. मग समोर घरगुती पान आले, मी विचारले कि ह्यात जर्दा तर नाही ना ? मुखिया म्हणाले मगाशी तुम्ही बिडी आणि तंबाखूला नाही म्हणाल्याचे पाहिले आहे, आता मी चूक कशी करिन? मी मोठ्या प्रसन्न चित्ताने पान घेतले. सर्वांना उठून नमस्कार केला, मनात म्हणालो कि आता लवकर गेले पाहिजे, आपण गेल्याशिवाय हे लोक जेवणार नाहीत. सर्वांना आशिर्वादाचे हात करून श्रीसुक्तातील एक आशिर्वचन मोठयाने म्हणालो आणि बसमधून खाली उतरलो. माझे यजमान मल सोडायला बसपर्यंत आले, त्यांच्या पोऱ्याला उठवून मला माझ्या जागेवर बसवले, सगळे सामान नीट आहे ना याची माझ्याकडून खात्री करून घेतली व परत प्रेमाने नमस्कार करून तुमच्या मुळे माझे मोठे काम झाले अरं पुनःपुन्हा म्हणत बसमधून उतरले.

आता माझ्या डोळ्यावर जोरदार पेंग आली होती, दमलो असल्याने व पोट भरलेले असल्याने बसल्याजागीच झोप आली. रात्री कधीतरी बस सुरु झाली आणि शेजारच्या माणसाने हलवून उठवल्यावर समजले कि रतलाम आले आहे.

ईश्वरी योजना नेहमी काहीतरी वेगळीच असते आणि आपण मोकळ्या मनाने येणाऱ्या प्रसंगाला सामोरे गेलो तर नेहमीच चांगले घडते यावर माझा विश्वास आहे.

11:05 am